# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते,
# कस्तुरबा रुग्णालय.

क्र.एचओ/668/ केएच दि. 28.04.2023

## सूचना

कस्तुरबा रुग्णालयातील PCR प्रयोगशाळेकरीता 2 प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 6 महिन्याच्या कालावधीकरीता भरण्यासाठी दिनांक 03.05.2023 पासून ते 12.05.2023 रोजी 4.00 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्हता –**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B. Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBT)ची / डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा. (B.Sc. + D.M.L.T.)

किंवा

2) उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकीय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडीसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.

कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती खालील अटी व शर्तीनुसार राहील

1) कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त होणारे प्रयोगशाळा तंत्रज्ञ हे तत्सम पदाकरिता विहित केलेल्या अर्हता धारण करणारे असावेत.
2) कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त होणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.
3) कराराच्या कालावधीत कंत्राटी तत्वावरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना हमीपत्र सादर करावे लागेल.
4) कंत्राटी तत्वावरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना दरमहा रु. 18000/- इतके मानधन देण्यात येईल. त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
5) कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची एकावेळी 6 महीनाच्या कालावधीकरीता ( दर 45 दिवसांनी 1 दिवसाचा खंड देण्यात येईल) नेमणूक करण्यात येईल.
6) महानगरपालिका प्रशासन एक महिन्याची पूर्वसूचना देऊन त्यांची सेवा संपुष्टात आणेल.
7) नेमणूकीच्या विहित कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची राहील व तसे हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल.
8) कराराच्या कालावधीत संबंधित कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.
9) कराराच्या कालावधीत सदर प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीतील नियम लागू राहणार नाहीत. ही नेमणूक केवळ कंत्राटी पध्दतीवर राहील.
10) कंत्राट पध्दतीने काम करणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञा यांचे काम कराराच्या कालावधीत असमाधानकारक असेल तर अशा प्रयोगशाळा तंत्रज्ञाची कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी दि. 12.05.2023 रोजी 4.00 वाजेपर्यंत वैद्यकीय अधिक्षक कस्तुरबा रुग्णालय यांचे कार्यालयात अर्ज सादर करावेत. त्यानंतर येणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सही/-

**वैद्यकिय अधिक्षक**
**कस्तुरबा रुग्णालय**

D.Rutuja/Advertise/Lab Technician